कार्यालय पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो उस्मानाबाद
सत्यमेव जयते

**प्रेसनोट** दिनांक ०८.०१.२०१९.

**श्री. रत्नदिप भुजंग गंगावणे, वय ३३ वर्षे, तांत्रिक सहाय्यक, जिल्हा रेशीम कार्यालय, उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन स्वतः स्विकारल्याने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही.**

तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली त्याची थोडक्यात हकिगत अशी की - तक्रारदार यांचे वडील जिल्हा रेशीम कार्यालय, उस्मानाबाद मधील मनेरगा अंतर्गत रेशीम उद्योग विकास योजनेचे लाभार्थी आहेत. तक्रारदार यांना त्यांच्या शेतात तुती लागवड करणे, संगोपन करणे, रेशीम किटक संगोपन गृहाची उभारणी करणे या कामाचे कुशल बील काढणेसाठी **जिल्हा रेशीम कार्यालय, उस्मानाबाद** येथील लोकसेवक श्री. गंगावणे, तांत्रिक सहाय्यक हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करित आहेत.

त्यामुळे पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्रीकांत परोपकारी, पोलीस उप अधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विनय बहिर, पोलीस निरीक्षक यांनी तक्रारीची शहानिशा करुन श्री. बी.जी. आघाव पोलीस निरीक्षक व अे.सी.बी. युनिट, उस्मानाबाद टीमच्या सहाय्याने सापळा रचुन आज दि. ०८.०१.२०१९ रोजी लोकसेवक **श्री. रत्नदिप भुजंग गंगावणे, वय ३३ वर्षे, तांत्रिक सहाय्यक, जिल्हा रेशीम कार्यालय, उस्मानाबाद** यांनी वर नमूद कामासाठी तक्रारदार यांचेकडुन **४,५००/- रुपये** लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदरची लाचेची रक्कम ही **जिल्हा रेशीम अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद** येथे कार्यालयाचे खालील बाजुस असलेले पोर्चमध्ये स्विकारण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा-२०१८) अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. पुढील तपास श्री. विनय बहिर, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद हे करित आहेत.

अँन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, अे.सी.बी. विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे** **www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, **टोल फ्री क्र. १०६४**, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९

**प्रति,**

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

**(विनय बहिर)**
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.

Scanned by CamScanner